# हिंगोली जिल्ह्यात युवा सेनेची ऐतिहासिक कामगिरी; १०० टक्के नियुक्त्यांसह महाराष्ट्रात अव्वल स्थान

## रामभाऊ कदम यांच्या नेतृत्वाखाली संघटनात्मक बळकटीला नवी दिशा; डॉ. श्रीकांत शिंदे व पूर्वेश सरनाईक यांच्याकडून विशेष कौतुक



(महेंद्र पुरी/दै.धर्मयोध्दा)

**हिंगोली** - शिवसेना मुख्य नेते तथा महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री मा. एकनाथजी शिंदे यांच्या दूरदर्शी नेतृत्वाखाली, युवा सेना प्रमुख तथा खासदार मा. डॉ. श्रीकांत शिंदे आणि युवा सेना कार्याध्यक्ष मा. पूर्वेश सरनाईक यांच्या मार्गदर्शनातून हिंगोली जिल्ह्यात युवा सेनेने संघटनात्मक क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन केले आहे. शिवसेना जिल्हाप्रमुख तथा आमदार मा. संतोष (दादा) बांगर यांच्या नेतृत्वाखाली युवा सेना जिल्हाप्रमुख मा. रामभाऊ कदम यांनी हिंगोली, कळमनुरी आणि वसमत या तिन्ही विधानसभा मतदारसंघांमध्ये शंभर टक्के बीएलए नियुक्त्या पूर्ण करून संघटनेची मजबूत पायाभरणी केली आहे. युवा सेनेच्या या प्रभावी नियोजनामुळे प्रत्येक बूथपर्यंत सक्षम कार्यकर्त्यांचे जाळे निर्माण झाले असून आगामी जिल्हा परिषद निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर संघटना अधिक सशक्त करण्यासाठी गावागावांत युवा सेना शाखा स्थापन करण्याचे कामही वेगाने सुरू आहे. युवकांना संघटनेशी जोडून नेतृत्वाची नवी फळी तयार करण्यावर विशेष भर दिला जात असल्याने कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. हिंगोली जिल्ह्याने बीएलए नियुक्ती मोहिमेत महाराष्ट्रात प्रथम क्रमांक पटकावत राज्यभरात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. या उल्लेखनीय कामगिरीची दखल घेत युवा सेना प्रमुख खासदार मा. डॉ. श्रीकांत शिंदे आणि युवा सेना कार्याध्यक्ष मा. पूर्वेश सरनाईक यांनी युवा सेना जिल्हाप्रमुख रामभाऊ कदम यांचे विशेष अभिनंदन करत त्यांच्या संघटन कौशल्याचे कौतुक केले. याच जोमाने आगामी निवडणुकांमध्येही कार्यरत राहून संघटना अधिक व्यापक आणि प्रभावी करण्यासाठी शुभेच्छा देत वरिष्ठ नेतृत्वाने हिंगोलीच्या युवा सेनेवर विश्वास व्यक्त केला आहे. या यशामुळे जिल्ह्यातील युवा सेनेच्या कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून भविष्यातही संघटन विस्ताराच्या दिशेने आणखी वेगाने वाटचाल करण्याचा निर्धार व्यक्त केला जात आहे.

# घनसावंगी येथे शिवसेना संवाद बैठकीत राज्यमंत्री आशिष जैस्वाल यांचा सत्कार



(बाळासाहेब ढेरे /दै.धर्मयोध्दा)

**घनसावंगी** - राज्याचे वित्त, नियोजन, कृषी, मदत व पुनर्वसन राज्यमंत्री तथा शिवसेना संपर्कमंत्री आशिष जैस्वाल हे शिवसेना संवाद बैठकीनिमित्त घनसावंगी येथे आले असता त्यांचे शिवसैनिकांच्या वतीने उत्साहात स्वागत करण्यात आले. यावेळी आमदार हिकमत उढाण, शिवसेना विभागप्रमुख विष्णुपंत कोरडे, युवानेते अमित मुळे, शुभम कोरडे तसेच तालुक्यातील शिवसेना पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते राज्यमंत्री आशिष जैस्वाल यांचा शाल व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. संवाद बैठकीत पक्ष संघटन मजबुती, जनसामान्यांचे प्रश्न, विकासकामे तसेच आगामी राजकीय घडामोडींवर चर्चा करण्यात आली. यावेळी उपस्थित शिवसैनिकांना पक्ष बळकटीसाठी एकजुटीने कार्य करण्याचे आवाहन करण्यात आले. बैठकीमुळे शिवसैनिकांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून पक्ष संघटना अधिक मजबूत करण्याचा निर्धार कार्यकर्त्यांनी व्यक्त केला.

## थोडक्यात...

### साळे गावातील मंगेश टोपे चा रोटाव्हेटर मध्ये अडकुन मृत्यू



(गणेश कोळेकर/ दै.धर्मयोध्दा)

**केज** – तालूक्यातील साळेगाव येथे शेतात मशागत करत असताना रोटाव्हेटर मध्ये अडकून गंभीर जखमी झालेल्या तरुणाचा लातूरमध्ये उपचारा दरम्यान मृत्यू. ३२ वर्षीय मंगेश टोपे या तरुणाचे लातूर येथे उपचारा दरम्यान दुर्दैवी मृत्यू झाला तब्बल दहा दिवस मृत्यूची झुंज दिल्यानंतर त्याची प्राणज्योत मालवली. तो २ जून रोजी आपल्या शेतामध्ये शेतीची मशागतीचे काम करत होता काम करत असताना ट्रॅक्टर वर चढत असताना अचानक तोल गेल्यामुळे चालू रोटावेटर मध्ये अडकला त्यामुळे तो गंभीर जखमी झाला होता. या घटनेमुळे साळेगाव परिसर मध्ये हळहळ व्यक्त केली जात आहे .

### राव्हा येथे वादळी वाऱ्यात सोलर पंपाचे नुकसान




(अजहर खान/दै.धर्मयोध्दा)

**सेलू** – तालुक्यातील मौजे राव्हा येथे वादळी वाऱ्याने शेतातील सोलार पंपाचे फार मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे यामुळे शेतकऱ्यांना सिंचनाचा प्रश्न निर्माण झाला असून सोलार कंपनीने तात्काळ नुकसान झालेल्या सोलार चे दुरुस्ती करून सौर प्लेट बदलून देण्याची मागणी येथील महिला शेतकरी मनकर्णाबाई मुरलीधर शिंदे यांनी अधीक्षक अभियंता परभणी यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे दिनांक ३ जून रोजी झालेल्या वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसात सौर प्लेट चे व फाउंडेशनचे पत्रे उचकटल्याने मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे यामुळे पिकांना पाणी देण्याची मोठी समस्या निर्माण झाली आहे सौर कृषी कंपनीने सौर प्लेट फाउंडेशन ची दुरुस्ती करून देण्यात यावी अशी मागणी सौ मनकर्णाबाई मुरलीधर शिंदे यांनी केली आहे.

### MH- Nursing CET २०२६ परीक्षेत ज्ञानसाधना NEET & JEE फाऊंडेशन चा सर्वोत्कृष्ट निकाल

**धर्मापुरी**– – २०२६ MH- Nursing CET चा निकाल नुकताच जाहीर झाला असून ज्ञानसाधना NEET & JEE फाउंडेशन, परभणी येथील विद्यार्थ्यांनी सर्वोत्कृष्ट यश संपादन केले आहे. MH-Nursing CET Result- २०२६

१) राठोड नैना –९३.०२ २) गमे पूजा –९२.०४ ३) नेमाने प्राची –९२.०३ ४)मंगनाळे रोशनी–८९.०० ५) शेख सना –८८.३६ ६) नांदेडकर नंदिनी –८६.४६ ७) दंतवार ओम –८३.३२ ८) शिंदे हरीश –८३.०६ सर्व विद्यार्थ्यांचे संस्था अध्यक्ष प्रा. किरण सोनटक्के सर, संस्थेच्या सचिव प्रा.सौ. शितल सोनटक्के मॅडम व समन्वयक, विभाग प्रमुख, परीक्षा विभाग प्रमुख , सर्व प्राध्यापकांच्या वतीने खूप खूप अभिनंदन.

# आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड उपक्रमात सहभागी होण्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांचे आवाहन

(महेंद्र पुरी/दै.धर्मयोध्दा)



**हिंगोली**- आयुष मंत्रालय व पेयजल व स्वच्छता विभाग, जलशक्ती मंत्रालय, भारत सरकार तसेच हॅबिल्ड हेल्थ टेक प्रा. लि. यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय योग दिन २०२६ निमित्त दि. १४ जून २०२६ रोजी सकाळी ६.१५ ते ७.३५ या वेळेत युट्यूबच्या माध्यमातून विशेष योग सत्राचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमाची गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड ( ) मध्ये अधिकृत नोंद करण्याचा मानस असून, देशभरातून मोठ्या संख्येने नागरिकांचा सहभाग अपेक्षित आहे. हा उपक्रम जिल्हा, तालुका व ग्रामपंचायत स्तरावर प्रभावीपणे राबविण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. याअंतर्गत गावातील सर्व नागरिक, महिला बचत गट, युवक मंडळे, शाळा, अंगणवाडी सेविका तसेच विविध सामाजिक संस्थांना या उपक्रमाची माहिती देऊन त्यांचा सहभाग वाढविण्यासाठी दवंडी, व्हॉट्सअॅप गट, नोटीस बोर्ड आदी माध्यमांतून व्यापक प्रसिद्धी करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या उपक्रमात सहभागी होण्यासाठी प्रत्येक सहभागधारकाने १८००–३१५–७००८ या टोल–फ्री क्रमांकावर मिस्ड कॉल देणे आवश्यक आहे. नोंदणी पूर्ण झाल्यानंतर संबंधित व्यक्तीच्या व्हॉट्सॲपवर युट्यूब लिंक प्राप्त होईल. त्यानंतर प्रत्येक सहभागधारक आपल्या मोबाईलवरून स्वतंत्रपणे लॉग–इन करून योग सत्रात सहभागी होऊ शकेल. गिनीज वर्ल्ड रेकॉर्डसाठी प्रत्येक नोंदणीकृत सहभागधारकाचे डिव्हाईस अधिकृतरीत्या नोंदविण्यात येणार आहे. दि. १४ जून २०२६ रोजी सकाळी ६.१५ ते ७.३५ या वेळेत आयोजित युट्यूब लाईव्ह योग सत्रात जास्तीत जास्त नागरिकांनी सहभागी होऊन भारताच्या या ऐतिहासिक उपक्रमास हातभार लावावा, असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांनी केले आहे.

# वादळ वाऱ्याने सोलरचे नुकसान




**परभणी** – सोन्ना येथे ६ जून २०२६ रोजी झालेल्या वादळी वाऱ्याने परिसरात अनेक शेतकऱ्यांचे नुकसान झाले असून सोन्ना शिवारातील गट नंबर २३५ मधील शेतकरी ज्योती छत्रगुण वावरे यांच्या शेतातील सोलार चे पूर्णतः नुकसान झाले आहे या झालेल्या नुकसानीचे तात्काळ पंचनामे करून नुकसान भरपाई देण्याची मागणी शेतकऱ्यांच्या वतीने करण्यात येत आहे शेतकरी विजेच्या लपंडावापासून बचाव करण्यासाठी सोलर पंपाचा वापर करत आहे परंतु सततच्या वारे वादळ आणि नैसर्गिक आपत्तीने या सोलर चे नुकसान सातत्याने होत असून सहा जून रोजी झालेल्या वादळी पावसाने शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे.

## डासांचा उपद्रव वाढला

**परभणी** – शहरात मोठ्या प्रमाणावर डासांचा प्रादुर्भाव वाढला आहे. त्यामुळे तापासारखे आजार बळावण्याची शक्यता निर्माण झाली आहे. डासांचा बंदोबस्त करण्यासाठी महानगरपालिकेने धूर फवारणी करावी, वाढत्या डासांमुळे लहान मुलांना डेंग्यु मलेरीया सारख्या अजारांचा सामना करावा लागत आहे तर उन्हाळ्याच्या दिवसात पडणाऱ्या पासामुळे साचलेल्या पाण्यापासुन डासांची निर्मिती होऊ शकते यावर काहीतरी प्रशासनाने उपाययोजना करावी अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

# विवाहित महिला बेपत्ता आढळल्यास कळविण्याचे आवाहन

**परभणी** - शहरातील मल्हार नगर परिसरातील विवाहित महिला घरातून बाहेर गेल्यानंतर परत न आल्याने तिच्या पतीने पोलिसांत बेपत्ता झाल्याची तक्रार दाखल केली आहे. याबाबत रोहित शिवाजीराव खुणे (वय २४, रा. मल्हार नगर, परभणी) यांनी दि. ८ जून २०२६ रोजी नानलपेठ पोलिस स्टेशनमध्ये तक्रार दिली. त्यांच्या तक्रारीनुसार, पत्नी दिव्या रोहित खुणे (वय १९) ही दि. ८ जून रोजी दुपारी अंदाजे १.३० वाजण्याच्या सुमारास शिवलेले ब्लाऊज आणण्यासाठी जाते, असे सांगून घरातून निघून गेली. मात्र त्यानंतर ती परत घरी आली नाही. या प्रकरणी पुढील तपास सुरू आहे. हरवलेल्या महिलेचे वर्णन पुढीलप्रमाणे आहे : रंग गोरा, उंची अंदाजे ४ फूट, बांधा सडपातळ, चेहरा लांबट असून ती मराठी भाषा बोलते. घरातून बाहेर पडताना तिच्या अंगात पिवळ्या रंगाची साडी होती. सदर महिलेबाबत कोणास माहिती मिळाल्यास नानलपेठ पोलीस स्थानकाशी संपर्क करावा किंवा फोन क्र. ०२४५२–२२०४५०, मो. ९४२३९१०९०२ वर संपर्क क्रमांक करावा, असे आवाहन पोलीस निरीक्षक गणेश कदम यांनी केले आहे.

# जालना जिल्ह्यात शिवसेना संघटना अधिक सक्षम करण्यासाठी संपर्कमंत्री आशिष जयस्वाल यांची दमदार सुरुवात

(प्रविण जगताप/दै.धर्मयोध्दा)

**जालना** - शिवसेना मुख्य नेते तथा राज्याचे उपमुख्यमंत्री मा. एकनाथजी शिंदे यांनी जालना जिल्ह्याच्या संपर्कमंत्रिपदाची जबाबदारी सोपवल्यानंतर राज्याचे राज्यमंत्री मा. आशिषजी जयस्वाल यांनी आज प्रथमच जालना जिल्ह्यात पक्ष संघटनेच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण आढावा बैठक घेतली. यावेळी जालना विधानसभेचे आमदार मा. अर्जुनजी खोतकर, घनसावंगीचे आमदार मा. हिकमतजी उढाण, पक्षाचे पदाधिकारी, बूथस्तरीय कार्यकर्ते तसेच संबंधित जबाबदार प्रतिनिधी उपस्थित होते.

बैठकीत बूथ लेव्हल एजंट नियुक्ती, विशेष सघन पुनरिक्षण मोहीम, मतदार यादी अद्ययावत करण्याची प्रक्रिया, बूथनिहाय संघटनात्मक तयारी आणि आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पक्ष बळकटीकरणाच्या विविध बाबींचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

यावेळी मा. आशिषजी जयस्वाल यांनी प्रत्येक विधानसभा मतदारसंघातील नियुक्ती व मोहिमेच्या प्रगतीची माहिती घेत संबंधित पदाधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या. शिवसेना संघटना गाव, बूथ आणि पानापर्यंत अधिक मजबूत करण्यासाठी नियोजनबद्ध पद्धतीने काम करण्याचे आवाहन त्यांनी केले.

बैठकीनंतर प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना मा. जयस्वाल म्हणाले, ''शिवसेना मुख्य नेते मा. एकनाथजी शिंदे साहेब यांनी माझ्यावर जालना जिल्ह्याच्या संपर्कमंत्रिपदाची जी महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपविली आहे, त्या विश्वासास पात्र ठरण्यासाठी मी पूर्णपणे कटिबद्ध आहे. संघटनात्मक बळकटी, कार्यकर्त्यांचा सन्मान आणि प्रत्येक बूथपर्यंत पक्षाची ताकद पोहोचविणे हेच माझे प्रमुख उद्दिष्ट राहील.''

जालना जिल्ह्यात शिवसेनेची संघटनात्मक ताकद अधिक वृद्धिंगत करण्यासाठी सातत्याने दौरे, बैठका आणि कार्यकर्त्यांशी संवाद साधला जाणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. राज्य नेतृत्वाच्या मार्गदर्शनाखाली जालना जिल्ह्यात पक्ष संघटना आणखी सक्षम, सशक्त आणि विजयाभिमुख करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

''बूथ मजबूत तर शिवसेना मजबूत; शिवसेना मजबूत तर जनतेचा विश्वास अधिक दृढ'', या संदेशासह पक्ष संघटन अधिक प्रभावी करण्यासाठी व्यापक कृती आराखडा राबविण्यात येणार असल्याचेही मा. जयस्वाल यांनी सांगितले.

# बसवराज पाटील यांना सर्वाधिक मताधिक्य देणार –आमदार धस



(मधुसूदन सोनवळकर/ दै.धर्मयोध्दा)

**गेवराई** - येत्या १८ जून रोजी होणाऱ्या विधान परिषद बीड – लातूर – धाराशिव मतदार संघात बसवराज पाटील यांना सर्वाधिक मताधिक्य देऊन निवडूण देणार असल्याचे आमदार सुरेश धस यांनी गेवराई येथे आयोजित बैठकीत बोलतांना सांगितले माजी मंत्री बदामराव पंडीत यांचे निवासस्थानी महायुतिचे उमेदवार बसवराज पाटील म्हणाले की गेवराई च्या विकासासाठी निधीची कमतरता भासू देणार नाही या वेळी माजीमंत्री बदामराव पंडीत यांनी गेवराई च्या सर्व महायुतिच्या मतदारांना उमेदवार बसवराज पाटील यांच्या मागे सर्वांनी खंबीर पणे ऊभे राहुन येत्या १८ जून रोजी होणाऱ्या विधान परिषद निवडणूकीत सर्वांनी मतदानरुपी पाठींबा बसवराज पाटील यांना द्या असे सांगितले औसा विधान सभा आमदार अभिमन्यू पवार माजी आमदार लक्ष्मणराव पवार बीड जिल्हा भाजपा अध्यक्ष शंकरराव देशमुख , माजी सभापती युद्धजीत पंडित ऊप नगाराधक्ष ॲड भगवानराव घुंबार्डे भाजपा गट नेते राजेंद्र राक्षसभुवणकर व महायुतीचे सर्व नगरसेवक जिल्हा परिषद सदस्य मोठया संख्येने उपस्थीत होते बाळराजे पवार यांच्या मुलाचा विवाह असल्या कारणामुळे ते बैठकीला ऊपस्थित राहू शकले नाहीत

# हिंगोली जिल्हा अपघातमुक्त करण्यासाठी पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांची विशेष मोहीम; सेनगाव तालुक्यातील ब्लॅक स्पॉटची प्रत्यक्ष पाहणी

### आरटीओ, वाहतूक पोलीस व स्थानिक पोलिसांचा संयुक्त पुढाकार; स्पीड ब्रेकर, रेडियम फलक, बॅरिकेड्स व जनजागृतीद्वारे अपघात रोखण्यावर भर

(महेंद्र पुरी/दै.धर्मयोध्दा)

**हिंगोली**- जिल्ह्यातील वाढत्या रस्ते अपघातांना आळा घालून हिंगोली जिल्हा अपघातमुक्त करण्याच्या उद्देशाने जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत डॉ. निलाभ रोहन, उपविभागीय पोलीस अधिकारी (डीवायएसपी) रसाळ, हिंगोली शहर वाहतूक पोलीस निरीक्षक शेख, वाहतूक अंमलदार, सेनगाव पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दीपक मस्के, वाहतूक विभाग तसेच आरटीओ विभागाच्या अधिकाऱ्यांनी सेनगाव तालुक्यातील विविध अपघातग्रस्त 'ब्लॅक स्पॉट'ना भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला. या पाहणीदरम्यान हिंगोली–जिंतूर मार्गावरील तोष्णीवाल कॉलेज परिसर, जिंतूर टी–पॉइंट, संत नामदेव मार्केट,




भानखेडा, हत्ता नाईक चौक, लिंबाळा तांडा पहाडी ढाबा तसेच रिसोड रोडवरील तहसील टी–पॉइंट, हाग्गे यांचे बंद हॉटेल परिसर, कौठा कोळसा चौक, वटकळी फाटा आणि पानकनेरगाव या ठिकाणांची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी संबंधित ठिकाणी स्पीड ब्रेकर उभारणे, रेडियम रिफ्लेक्टर बसविणे, बॅरिकेड्स लावणे तसेच ''वाहन हळू चालवा'', ''हेल्मेट वापरा'', ''दारू पिऊन वाहन चालवू नका'' अशा जनजागृतीपर सूचना फलक उभारण्याचे निर्देश देण्यात आले. यासोबतच विविध विभाग व स्थानिक पोलीस ठाण्यांना अपघात प्रतिबंधासाठी समन्वयाने काम करण्याच्या सूचना देण्यात आल्या. यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांनी नागरिकांना वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन केले. दुचाकीस्वारांनी हेल्मेटचा वापर करावा, चारचाकी वाहन चालकांनी सीट बेल्ट लावावा, मद्यपान करून वाहन चालविणे टाळावे तसेच ''आपली घरी कोणी तरी वाट पाहत आहे'' ही भावना मनात ठेवून जबाबदारीने वाहन चालवावे, असे भावनिक आवाहन त्यांनी केले. पोलीस अधीक्षकांच्या सूचनांची तत्काळ अंमलबजावणी करत सेनगाव पोलीस ठाण्याने विविध अपघातग्रस्त ब्लॅक स्पॉटवर रेडियम पट्ट्या व बॅरिकेड्स उभारण्याचे काम सुरू केले असून, या उपक्रमामुळे भविष्यात अपघातांचे प्रमाण कमी होण्यास मोठी मदत होईल, असा विश्वास व्यक्त केला

दैनिक धर्मयोध्दा हे पत्र मुद्रक, प्रकाशक व मालक शिंदे रामेश्वर गणपतराव यांनी प्रविण प्रिटींग प्रेस शॉप नं.१४ सुपर मार्केट, कारेगांव रोड, परभणी ४३१ ४०१ (महाराष्ट्र) येथे छापून धर्मयोध्दा कार्यालय, विकास नगर, कारेगांव रोड, परभणी ४३१ ४०१ (महाराष्ट्र) येथुन प्रसिध्द केले. **संपादक–शिंदे रामेश्वर गणपतराव**

DHARMA YODDHA Daily Publisher, Printer, Owner by- Shinde Rameshwar Ganpatrao, Printed at Pravin Printing press Shop No 14 Super Market Karegaon Road Parbhani 431401 (M.S) And Published Dharmayoddha Karyalaya Vikas Nagar,Karegaon Road Parbhani. 431401 (M.S) Editor By - Shinde Rameshwar Ganpatrao